Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 613 – 619

DOI: 10.5281/zenodo.10259006

**Original Research Article**

# महात्मा गांधी यांच्या धार्मिक विचारातील विसंगतीचे विश्लेषण: एक अभ्यास

प्रा. डॉ. सुनिल चंदर सोनकांबळे

विभाग प्रमुख, इतिहास विभाग, लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय धर्माबाद जि. नांदेड ४३१८०९ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: sonkamblesunil499@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

भारतीय स्वातंत्र्य लढ्याची जडणघडण ज्यांच्या पदस्पर्शाने झाली त्यातील सर्वाधिक प्रसिद्ध नाव म्हणजे महात्मा गांधी होय. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एका पर्वाचे हिंदूत्ववादी चित्पावन ब्राह्मण असलेल्या टिळक युगाचा शेवट होऊन शुद्ध वैष्णव पंथीय बनिया या द्वीज जातीत जन्मलेल्या गांधी युगाचा आरंभ झाला.

महात्मा गांधींनी स्वातंत्र्य लढ्याचे सुत्र हाती घेतल्यावर स्वातंत्र्य लढ्याचा अग्निकुंड नव्या दमाने प्रज्वलित केला. त्यामुळेच त्यांच्या पुर्वी संथ गतीने इथे तीथे चाललेल्या स्वातंत्र्य लढ्याला गांधींच्या नेतृत्वाने गती प्राप्त झाली. त्यांच्या रुपाने ब्रिटीश साम्राज्या विरुध्द लढण्यासाठी सनदशीर मार्ग मिळाला असला तरी आरंभी सनदशीर मार्गाने लढण्याचा निर्धार करणारे महात्मा गांधी पुढे कधी अहिंसेच तर कधी हिंसेच समर्थन करीत स्वातंत्र्य लढ्याचे सर्वंकष नेतृत्व करताना दिसून येतात. इ.स.१९२० ते १९४७ हा त्यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील नेतृत्वाचा रोमहर्षक काळ आहे.या काळात त्यांनी असहकार, सविनय कायदेभंग, स्वदेशी चळवळीच्या माध्यमातून संपूर्ण भारतात आपले प्रभुत्व निर्माण केले. भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे आम्हीच खरे शिल्पकार म्हणणारी राष्ट्रीय सभा (कांग्रेस) गांधींचे नेतृत्व सुरु होण्या आधी देशासाठी विशेष असे काही केलेले नव्हते केवळ अधिवेशने आणि ब्रिटिश शासनाच्या विरोधातील प्रस्ताव एवढ्या पुरतीच ती मर्यादित होती. १९१९ मध्ये गांधी यांनी काँग्रेसचा ताबा घेतल्यानंतर मात्र काँग्रेस हा कृती प्रवण पक्ष झाला.त्यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने ब्रिटिशांच्या विरोधात लढण्यासाठी एकजूट होऊन ज्या शक्ती संपादित केल्या. त्या शक्ती संपादन करण्याचा गांधीच्या पूर्वी काँग्रेसने कधी विचारही केला नव्हता.मात्र गांधींच्या आगमनाने काँग्रेसने आपले एक शास्त्रागार निर्माण केले एका अर्थाने गांधींच्या नेतृत्वाखाली हा शक्ती संपन्न झाला. वेळोवेळी त्या शक्तीचा उपयोगही केला. त्या शक्ती म्हणजे १. असहकार २. बहिष्कार ३. सविनय आज्ञाभंग आणि ४. उपोषण या आहेत. त्यातील असहकाराचा प्रमुख

उद्देश शासनाला हातबल करणे निरुपयोगी बनविणे हा होता. यात सरकारी शाळा महाविद्यालये न्यायालये यांना मान्यता न देणे किंवा त्यांचे अधिकार नाकारणे आणि सरकारी सेवा काम करण्यास नकार देणे नकार देऊन सरकारला काम करणे अशक्य व्हावे असा प्रयास करणे असा होता.दुसरे बहिष्कार नावाचे हे असे शस्त्र होते की, ज्यांचा उपयोग काँग्रेसच्या आज्ञापालनास नकार देणाऱ्या व्यक्तीवर दडपण आणण्यासाठी होत होता.ज्यांना काँग्रेसने आज्ञा पाळण्यासाठी भाग पाडावे यासाठी या शास्त्राचा वापर होत होता. हे दुधारी शस्त्रच होते त्यात सामाजिक आणि आर्थिक दोन्ही स्वरूपाचा बहिष्कार याचा समावेश होता. सामाजिक बहिष्कार हा सामाजिक संबंध समाप्त करणारा होता.यात न्हावी धोबी दुकानदार व्यापारी खाटीक पुजारी यांच्या पासून वंचित व्हावे लागत असे.

आज्ञाभंग किंवा सविनय हा ब्रिटिश शासनाला प्रत्यक्ष ढोसा लावण्यासाठी वापरले जाणारे शस्त्र होते. यात हेतूपूर्वक कायद्याचा भंग केला जात होता. या शास्त्राचा उपयोग जन आंदोलनाच्या स्वरूपात किंवा प्रसंगी वैयक्तिक आंदोलनाच्या स्वरूपातही केला जात असे.उपोषण ही शुद्ध वैयक्तिक कृती होती.आमरण उपोषणाचा मार्ग काँग्रेसने ब्रिटिशांच्या विरोधात कधी अवलंबिला नाही.उपोषण हे नेहमी विशिष्ट कालावधीसाठी विशेषत्वाने गांधी यांनी आपल्यासाठी राखून ठेवले होते. वरील सर्व शक्तींचा उपयोग १९२० ते १९४७ च्या कालावधीत महात्मा गांधींनी ब्रिटिश सरकारच्या विरोधात केला असला तरी राखून ठेवलेले एक उपोषणाचे राखीव शस्त्र मात्र आपल्याच देशातील अस्पृश्य बांधवांच्या राजकीय हक्काविरुद्ध वापरला आणि हाच त्यांचा हिंदू धर्मनिष्ठ वृत्तीचा भक्कम पुरावा ठरला.१९३२ साली जातीय निवाड्या विरुद्ध त्यांनी याचा निर्दयपणे वापर केला असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.१एकीकडे अस्पृश्यता कायम राहण्यापेक्षा हिंदू धर्माचा मृत्यू मला आवडेल असे म्हणणाऱ्या महात्मा गांधींनी दुसरीकडे जातीय निवाड्या विरुध्द उपोषणाचे हत्यार उपसले स्वतंत्र मतदारसंघ हा इस्लाम शिख ख्रिश्चन यांना मिळाला तरी चालेल पण तो अस्पृश्यांना मिळू नये यासाठी प्राणांची पराकाष्ठा केली.गोलमेज परिषदेत आपल्या बहिष्कृत बांधवांवर गतकाळात झालेल्या अमानुष अत्याचाराची कैफियत मांडून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मिळवलेली ही राजकीय कमाई गांधींनी आपल्या अट्टाहसाने हिरावून घेताना त्यांनी जी प्रतिक्रिया दिली त्यावरुन हिंदू धर्माबद्दलची त्यांची कट्टर आस्था सिद्ध होते. ही प्रतिक्रिया देताना ते म्हणतात "मी आंबेडकरां प्रती सन्मान व्यक्त करतो अस्पृश्यांची उन्नती व्हावी या त्यांच्या इच्छांचाही मी सन्मान करतो. त्यांच्या क्षमतेचाही मी आदर करतो पण मी नम्रपणे हे सांगू इच्छितो की कदाचित त्यांच्या जीवनात त्यांना जे कटू अनुभव आले त्यांचा प्रभाव त्यांच्या न्यायबुद्धीवर पडला असावा पण त्यांचे श्रम चुकीच्या दिशेने केलेले श्रम आहेत असे म्हणताना मला अत्यंत वेदना होतात. पण मी ह्या भावना जर व्यक्त केल्या नाहीत तर माझ्या प्राणापेक्षाही प्रिय असलेल्या अस्पृश्यांच्या विषयी माझ्या कर्तव्यप्रती ती बेइमानी होईल तो अप्रमाणिकपणा होईल संपूर्ण जगाचे राज्य जरी मला बहाल केले गेले तरी मी अस्पृश्यांच्या अधिकाराचा सौदा करणार नाही मी हे विधान माझ्या जबाबदारीची जाणीव ठेवून करीत आहे आणि मला असे म्हणावेसे वाटते की डॉ. आंबेडकरांनी जे मागणी पत्र सादर केले आहे ते योग्य मागणी पत्र नाही डॉ.आंबेडकर जेव्हा संपूर्ण हिंदुस्थानातील अस्पृश्यांच्या वतीने हे मागणी पत्र सादर केल्याचा दावा करतात तेव्हा हे मागणी पत्र हिंदू धर्मांची फाळणी करेल असे मला वाटते म्हणून या मोबदल्यात मला काहीही मिळाले तरी मी हिंदू

धर्माची फाळणी होऊ देणार नाही डॉ. आंबेडकरांची तशी इच्छाच असेल तर अस्पृश्यांनी मुस्लिम किंवा ख्रिश्चन धर्म स्वीकारला तरीही मला काहीही वाटणार नाही मी ते सहन करेल पण ग्रामपातळीवर हिंदू धर्म दोन तुकड्यात विभागला जावा हे मला कदापिही सहन होणार नाही. जे अस्पृश्यांच्या राजकीय हक्क विषयी बोलतात त्यांना हिंदुस्तान माहीतच नाही त्यांना वर्तमान समाजाची संरचना कशी आहे याची माहिती नाही. म्हणून मी हे स्पष्टपणे सांगू इच्छितो की या बाबीचा विरोध करणारा मी एकटाच असलो तरी ही संपूर्ण शक्तीनिशी प्रसंगी जीवाचे मोल देऊनही मी याचा विरोध करेन २. गुजरात मधील काठेवाडी येथे बनिया या वैष्णव संप्रदायी कुटुंबात जन्मलेल्या मोहनचंद गांधींचे वडील करमचंद गांधी हे पोरबंदर राजकोट व अन्य काही संस्थांनाचे दिवाण होते त्या अर्थी हे उच्च वर्णीय संस्कृतीत वाढलेले होते. त्यांची आई पुतळाबाई या तर कट्टर वैष्णव पंथी असल्याने त्यांनी अस्पृश्येतेचे काटेकोर पालन केले.सहाजिकच गांधींच्या घरातुन त्यांना हिंदू धर्माचे संस्कार मिळाले होते.३ म्हणूनच " काँग्रेसचा एकहाती ताबा घेतल्यावर त्यांनी अस्पृश्यता चळवळीला बळ देण्याचे मनोमन ठरविले असले तरी घरातील हिंदू संस्काराचा आणि राष्ट्रीय लढ्यातील टिळकांचा धार्मिक वारसा त्यांना अस्वस्थ करीत होता.त्यामूळेच" ते स्वतः ला सनातनी हिंदू म्हणवून घेत आणि त्याची कारणे अशी देत की ईश्वर व त्यांचे अवतार आत्म्याचे अमरत्व व पुनर्जन्म यावर माझे श्रद्धा आहे वेद उपनिषदांवर माझा विश्वास आहे वर्ण आश्रम व्यवस्था मला मान्य आहे आणि गोरक्षणावर माझी भक्ती आहे ४." म्हणून त्या विरुद्ध बोलणारा किंवा चळवळ करणारा कोणीही माझा शत्रू असेल असे सांगत. लोकमान्य टिळकांच्या नंतर हिंदू धर्माचा अशा जाहीर पध्दतीने पुरस्कार करणाऱ्या महात्मा गांधीचा तसा राष्ट्रीय चळवळीचे सुत्र हातात घेण्यापूर्वीचा पिंड हा शुद्ध अध्यात्मिक आणि धार्मिक होता. हे सहज लक्षात येते. त्यामुळे लोकमान्य टिळकांच्या जहालवादी राष्ट्रवादाला बगल देऊन मवाळ राष्ट्रवादाचा पुरस्कार करणाऱ्या " गांधींनी आपल्या राजकारणाला सुरुवातीपासूनच धार्मिक अधिष्ठान दिले त्यामुळे जनसमुदायावर त्यांचे वजन अधिक पडत असे भारतीय जनता परंपरानिष्ठ आणि धर्मनिष्ठ असल्यामुळे गांधींचे तत्त्वज्ञान त्यांच्या अधिक जवळ जाऊ शकले गांधी वर्णाश्रम धर्मावर विश्वास ठेवणारे होते. त्याचा उघडपणे पुरस्कार देखील ते करीत असत. तात्विक पातळीवर जात-पात न मानणारा परंतु व्यक्तिगत जीवनात परंपरा सांभाळणारा नेता सर्वसाधारण भारतीय माणसांच्या अधिक जवळ जाऊ शकतो हे गांधींच्या उदाहरणावरुन स्पष्ट होण्यास हरकत नाही. १९१९ ला साऊथ बेरो कमिशन समोर उभे राहून अस्पृश्यांच्या राजकीय हक्काची मागणी करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलितांचे नवे उच्च विद्या विभूषित पुढारी आहेत हे उभ्या जगाला ध्यानात आले तरी गांधी मात्र स्वतः ला अस्पृश्यांचे खरे पुढारी म्हणवून घेत असत.अस्पृश्यांचे पुढारी म्हणून मिरवू पहाणाऱ्या गांधींने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कित्येक शतकांपासून तान्हलेल्या आपल्या बांधवांना पाणी पिण्याचा अधिकार मिळावा म्हणून केलेल्या चवदार तळे सत्याग्रहाला तोंडी देखील पाठींबा देत नाहीत." वास्तविक पहाता त्या सत्याग्रहाच्या सभेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महात्मा गांधींचा फोटो ठेवला होता. या सभेत गांधींच्या नावाचा जयघोष होत होता. हे विशेष.५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या सामाजिक लढ्याची सुरुवात करताना जरी गांधीना प्रेरक म्हणून स्विकारले असले तरी गांधींनी मात्र "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक विचारांना सातत्याने विरोध केला आहे. हा विरोध करताना हिंदू समाजाचे ऐक्य दुभंगू नये

यासाठी आपण हा विरोध करतो आहोत हे गांधींनी लोकांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला त्यामुळे सारा देश गांधींच्या बाजूने उभा राहिला परंतु गांधींना मिळालेला सवर्ण हिंदूंचा हा पाठिंबा भावनात्मक स्वरूपाचा होता त्याला कोणतेही वैचारिक अधिष्ठान नव्हते.६ हे ध्यानात घ्यावे लागेल. कारण या भावना हिंदू धर्माच्या परंपरागत जीवनशैलीत दडलेल्या असल्याने मा.गांधींनी यास भावनात्मक पातळीवर नेऊन हिंदू धर्माचा पाया भक्कम करण्याचा सातत्याने प्रयत्न केलेला दिसून येतो. म्हणूनच लोकमान्य टिळकांच्या नंतर ते इतर कोणाही पेक्षा हिंदु धर्माचे मोठे पुरस्कर्ते म्हणून गांधींनी आपली ओळख निर्माण केली आहे.सामाजिक चळवळीत त्यांनी एकीकडे समता बंधुभाव अस्पृश्यता निर्मूलनाला आपल्या झेंड्याखाली घेतले खरे परंतु दुसरीकडे जाती व्यवस्था हा हिंदू धर्माचा पाया आहे असे ते म्हणत होते. हा पाया ढासळून टाकणारी घोषणा त्यांच्या कानी पडल्यावर ते लगेच प्रतिक्रिया देत असत. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा केली त्यावेळी कोणत्याही हिंदू पुढाऱ्यांपेक्षा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतर घोषणला सर्वाधिक विरोध केला होता. महार जातीत जन्माला आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्माने आम्हाला माणूस म्हणून जगण्याची मुभा द्यावी या करीता ज्या चळवळी उभ्या केल्या त्या त्यांनी हिंदू धर्मात राहूनच केल्या. त्यांच्या महाड चवदार तळे सत्याग्रह मनुस्मृतीचे दहन काळा राम मंदिर या सत्याग्रहातील सर्व सहकारी हिंदू धर्मांचेच प्रचलन करणारे होते.परंतु यांची थोडी थोडकी संख्या पहाता बाकी मोठ्या प्रमाणात हा धर्म आपली दुराग्रही भूमिका सोडत नाही म्हणून त्यांनी अखेर हा धर्मच नाकारण्याची घोषणा केली. ही घोषणा करुन लगेच काही त्यांनी दूसरा धर्म स्वीकारला नाही. हिंदू धर्माला आपल्या अमानुष वर्तनात बदल करण्यासाठी सुमारे वीस वर्षांचा कालावधी दिला या कालावधीत सुधारण्या ऐवजी या धर्माच्या पुरस्कर्त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची टिंगल टवाळी करण्याचा सपाटा लावला. महात्मा गांधींनी तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या धर्मांतर घोषणला जणू धार्मिक युद्धाचे स्वरुपच दिले होते.एक स्वातंत्र्य सेनानी म्हणून त्यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सविनय कायदे भंग असहकार आंदोलन करुन " आपल्या नेतृत्वाची सुरुवात केल्यावर स्वातंत्र्य काही वर्षांनी अलीकडे आणले हे खरे असले तरी त्यांच्या व्यक्तिमत्वातील परस्पर विरोधी विसंगती ही त्यांच्यातील महात्म्यासह अस्पृश्यांच्या हिताला देखील बाधा ठरत होती. एकाच वेळी ते दोन परस्पर विरोधी भूमिका घेऊन चालण्याचा प्रयत्न करीत असत.चातुर्वर्ण्य व्यवस्था त्यांना मान्य नव्हती पण जाती व्यवस्थेचा पुरस्कार ते प्राणपणाने करीत होते. शहरी जीवनापेक्षा खेड्यातील जीवन त्यांना अभिप्रेत होते.पण यंत्र सामग्री आधुनिक तंत्रज्ञान त्यांना मान्य नव्हते. परंपरागत विचारावर त्यांची गाढ श्रध्दा होती. ते विचार ढासळण्यास कारण ठरणाऱ्या कोणत्याही प्रगतीस त्यांचा विरोध होता. पण पाश्चिमात्यांच्या विचारांवर त्याची श्रद्धा होती.भारतात अस्पृश्यता निर्मूलन चळवळ चालवतो म्हणणारे गांधी गोलमेज परिषदेत मात्र अस्पृश्यांच्या जातीय निवाड्याला प्राणपणाने विरोध करीत होते. एवढ्यावरच ते न थांबता या निवाड्या विरुध्द पुकारलेल्या आमरण उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी सरदार पटेल यांच्या बरोबर झालेल्या संभाषणात गांधींनी सांगितले की, अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ मिळाल्यानंतर त्याला वेगळे वळण लागेल. ते हिंदू विरोधी राहील मुसलमान गुंड आणि अस्पृश्य लोक हे एकत्र येतील आणि ते आपल्या सवर्ण हिंदूंना ठार करतील म्हणूनच मी अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदारसंघाला विरोध करीत "७ आहे असे

सांगितले गांधींच्या या बोलण्यातून त्यांची हिंदू धर्माबाबत असलेली कर्मठता तर स्पष्ट पणे दिसून येतेच पण त्यांच्या या कृतीने त्यांच्यातील महात्म्याचा आत्मा हिंदू धर्माला किती घट्ट चिकटून बसला आहे हे देखील स्पष्ट पणे दिग्दर्शित करतात. हा त्यांच्या धार्मिक विचारातील परस्पर विसंगतीचाच एक भाग होता.त्यांच्या मते मनुष्य हा कपडे बदलतो तसा धर्म बदलू शकत नाही अस्पृश्यांना हिंदू धर्माचा त्याग करावयाचा असेल तर त्यांना तो अधिकार आहे पण एखाद्या नाराज समुदायाने सामूहिक धर्मांतर केल्यास आपला धर्म नष्ट होत नाही असा खात्रीशीर दावा करून धर्मांतर घोषणे विषयी नाराजीचे सूर काढत महात्मा गांधींनी आपली हिंदू  धर्मनिष्ठा दाखविली म्हणूनच एकीकडे राष्ट्रीय स्वातंत्र्याची लढाई लढणारे महात्मा गांधी आणि दुसरीकडे आपल्या हिंदू धर्माने ज्यांना शेकडो वर्षांपासून धार्मिक  पारतंत्र्यात जखडून ठेवल आहे त्या अस्पृश्यांना स्वातंत्र्य द्यायला मात्र तयार होत नाहीत.उलट जो नमाज पडत नाही तो मुस्लिम कसला जो बायबल वाचत नाही तो ख्रिश्चन कसला तसाच जो हिंदू पूर्व परंपरा पाळत नाही तो हिंदू कसला अशी धर्म विषयाची निष्ठा प्रदर्शित करुन आपल्या धर्माचे  संस्कार नित्याने पाळणारा माणूसच खरा धर्मानुयायी असे ते म्हणतात.हिंदू धर्माच्या बाबतीतील त्यांचे हे विचार त्यांचा सात्विक अध्यात्म दिग्दर्शित करीत असले तरी या यातून ते या धर्माचा उघड उघड पुरस्कार करताना दिसून येतात. वास्तविक पाहता १९२० च्या दशकात भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील लोकमान्य टिळकांच्या युगाचा अंत आणि महात्मा गांधींच्या युगाची सुरुवात झाली. त्यांनी राष्ट्रीय स्वातंत्र्या बरोबरच आपल्या कार्य रेखेत अस्पृश्य निर्मुलन चळवळीलाही जागा दिली.देशाचे सर्वव्यापी नेतृत्व आपल्याच हाती पकडून ठेवण्याची त्यांची इच्छा वरचेवर बळावत चालली होती. देशाचे हिंदूचे अस्पृश्यांचे आणि त्याच बरोबर मुस्लिमांचे तारणहार आपणच व्हावे असे त्यांना वाटू लागले.त्यांच्याच समांतर काळात अस्पृश्यांच्या कळा सोसलेल्या मातीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाचा सर्वोच्च ज्ञानी पुरुष जरी या सामाजिक लढ्याच नेतृत्व करीत असला तरी अस्पृश्य हा हिंदू धर्माचाच एक घटक असल्याने त्यांचे खरे पुढारी आपणच आहोत असा त्यांचा भ्रम झालेला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या घोषणेमूळे हा भ्रम फूटून त्यांच्या एकहाती नेतृत्वालाच खिंडार पडण्याची भीती त्यांना वाटू लागली म्हणूनच या घोषणेचा विरोध करणाऱ्या मध्ये सर्वाधिक पुढाकार त्यांनीच घेतला. एवढ्यावरच ते थांबले नाहीत तर त्यांनी यास धार्मिक लढ्याचे स्वरुप देऊन देशाच्या स्वातंत्र्यासाठी एकजूट झालेल्या कॉंग्रेसलाच यासाठी गुंतविले. त्यामुळे धर्मांतर घोषणेला विरोध करणाऱ्यांच्या या गांधी प्रणीत छावणीत " डॉ. राजेंद्र प्रसाद,पंडित जवाहरलाल नेहरू, जमनालाल बजाज इत्यादी सवर्ण हिंदूंचे पुढारी होते.त्याच प्रमाणे जगजीवन राम नागपूरचे खांडेकर पुण्याचे राजभोज मद्रासी एम सी राजा गणेश आक्काजी गवळी दिवान चंद्र मुंबईचे पी. बाळू देवरुखकर इत्यादींचा फौज फाटा जमा करण्यात आला"८ त्यांचा हा फौजफाटा स्वातंत्र्य लढ्याचे कमी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतरावर अधिक चर्चा करु लागला.ही घोषणा झाल्यानंतर लगेचच गांधींनी प्रतिक्रिया दिली " अस्पृश्यतेला शेवटची घरघर लागली असता आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा करणे अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे.आंबेडकरां सारख्या उच्च शिक्षण संपन्न आणि उच्च ध्येयनिष्ठ मनुष्याचा राग.अस्पृश्यांचा होणारा अनन्वित छळ पाहून अनावर होतो हे आपण समजू शकतो. परंतु धर्म ही घरासारखी किंवा अंगरख्या सारखी वस्तू नाही की तो स्वच्छेने वाटेल तेव्हा बदलता येते. मनुष्याच्या शरीरापेक्षा त्याच्या अंतरात्म्याचा धर्म हा एक अविच्छीन्न भाग

आहे. माझी खात्री आहे की धर्मांतराने आंबेडकरांना आणि त्यांच्या ठरावाला पाठिंबा देणाऱ्या लोकांना जे पाहिजे ते मिळणार नाही. कारण लक्षावधी अशिक्षित आणि भोळे हरिजन यांची त्यांचे आणि ज्यांनी आपल्या पूर्वजांचा धर्म सोडला आहे. अशांचे ऐकणार नाही स्पर्श हिंदूंशी त्यांचे हित व अहीत निगडित आहे हे लक्षात आले म्हणजे ही घटना अशक्य वाटते." त्यांची ही प्रतिक्रिया त्यांच्या हिंदू धर्मनिष्ठतेची जाणिव करुन देण्याबरोबरच.९ टिळक चिपळूणकर भांडारकर यांच्या धर्मनिष्ठ प्रवृत्तीचा जणू ते वारसाच चालवित असल्याची ग्वाही देऊन जाते.याही पुढे जाऊन महात्मा गांधींनी गोलमेज परिषदेतील स्वतंत्र मतदार संघाला विरोध करताना अस्पृश्य हा हिंदू धर्मावरील कलंक असला तरी तो या धर्माचा अविभाज्य घटक आहे. तो कदापी तुटणार नाही याची खबरदारी मी घेईन असे वारंवार बोलून दाखवले आहे.असा हा धर्म निष्ठ महात्मा आजच्या पिढीचा दैवत बनला असला तरी त्यांच्या विचारातील विसंगती त्यांच्या राजकीय चळवळीतील नेतृत्वाला मर्यादा आणताना दिसून येतात. वास्तविक पहाता आपल्या भारतीय स्वातंत्र्याची लढाई ही एकट्या महात्मा गांधींनी लढली नाही. त्यांच्या आधी पासूनच याची सुरुवात झाली होती.१८५७ च्या उठावाने याची ठिणगी उडाली आणि उभ्या भारतात ब्रिटिशांच्या विरोधात सर्व सामान्य माणूस शेतकरी स्त्री पुरुष तरुणांनी आपल्याला जमेल त्या मार्गाने आंदोलनाची आग पेटवली. सुखदेव भगतसिंग राजगुरू चाफेकर बंधू यांच्या पासून लोकमान्य टिळक सुभाषचंद्र बोस सावरकर सरदार वल्लभभाई पटेल डॉ.राजेंद्र प्रसाद पंडित जवाहरलाल नेहरु यांच्यापर्यंत असंख्य धुरंधरांनी आपल्या आयुष्यातील महत्त्वाचे दिवस देशाच्या स्वातंत्र्यासाठी समर्पित केले.परंतु आज घडीला या समर्पणावर गांधीवादाचा साज चढवण्यात आला आहे.वास्तविक पहाता महात्मा गांधींनी देशाला नवे काही तत्वज्ञान दिले नाही जे दिले ते परस्पर विसंगत आहे.असे असले तरी आज घडीला गांधीवादाला मिळत असलेला राजाश्रय पहाता गांधीजींनी स्वातंत्र्य लढ्याच्या पार्श्वभूमीवर हिंदू विचारांशी केलेली जवळीकता हेच खरे विश्लेषण त्यांच्या धार्मिक विचारातील विसंगतीचे आहे.

**संदर्भ सूची**

१. काँग्रेस आणि गांधींनी अस्पृश्यांसाठी काय केले? डॉ भीमराव रामजी आंबेडकर, अनुवादक, प्रा. देविदास घोडेस्वार क्षितीज पब्लिकेशन, दिक्षा भूमी संदेश लष्करी बाग नागपूर आठवी आवृत्ती १५ मार्च २००९ पृष्ठ १७२)

२. उपरोक्त पृष्ठ ८२

३. गांधी आणि गांधींच्या आड, के. ना. सुखदेवे बहुजन साहित्य प्रसार केंद्र बेल तरओडई रोड नागपूर प्रथमावृत्ती १४ आक्टो २०१४ पृष्ठ १२६

४. महाराष्ट्र जीवन, परंपरा प्रगती आणि समस्या, दे.श्री. जोशी म.द. लोखंडे मेसर्स जोशी आणि लोखंडे प्रकाशन टिळक रास्ता पुणे १९६० पृष्ठ १९१

५. डॉ आंबेडकरांचे विरोधक हेरलेकर दिनकर, आनंद प्रकाशन जयसिंग पुरा औरंगाबाद पृथमावृती २६ जानेवारी १९८६ पृष्ठ ३५

६. उपरोक्त पृष्ठ ३६

७. उपरोक्त पृष्ठ ४७

८. समग्र आंबेडकर चरित्र खंड १० ॲड.बी. सी. कांबळे सुगावा प्रकाशन सदाशिव पेठ पुणे, द्वितीय आवृत्ती २मे २००७ पृष्ठ ६५

९. डॉ बाबासाहेब आंबेडकर धनंजय किर पाप्युलर प्रकाशन मालविय मार्ग ताडदेव मुंबई, पुनर्मुद्रण आवृत्ती एप्रिल १९९७ पृष्ठ ५२३